# मेट्रो-३च्या लिफ्टसाठी निविदा मंजूर

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पातील आरे डेपो ते दादर आणि ओसीसी बिल्डिंगदरम्यान एकूण १३ स्थानकांमध्ये उद्वाहक (लिफ्ट) यंत्रणा उभारण्यासाठी क्रेनेक्स ॲण्ड आयएफई समूहाची निवड करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेद्वारे जायकाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ही निवड करण्यात आली आहे.

संबंधित कंत्राटदार १३ स्थानके आणि ओसीसी बिल्डिंगच्या एकूण ७६ लिफ्टचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आदी प्रकारची कामे करणार आहेत. सर्वांत जास्त प्रमाणात प्रवासी वाहून नेण्याची क्षमता, ऊर्जाबचत करणारी यंत्रणा आणि रेडिओ फ्रिक्वेन्सी अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यात केला जाणार आहे. सर्वोत्तम लिफ्ट यंत्रणा ही मेट्रो-३ साठी अत्यंत महत्त्वाची असून त्यामुळे प्रवाशांना उत्तम सुविधा उपलब्ध होईल, असा विश्वास मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी व्यक्त केला.